International Journal for Multidisciplinary Research (IJFMR)

E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# जयंत पवार यांच्या कथालेखनाचे वेगळेपण

**प्रा. अनुराधा मनोहर मोरे**

बी.वाय.के.कॉलेज ऑफ कॉमर्स, नाशिक

**गोषवारा:**

समकालीन मराठी कथालेखनामध्ये जयंत पवार यांचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. मराठीतील एक अतिशय प्रगल्भ आणि वास्तवाचे भान जपत परखडपणे लेखन करणारे समकालीन लेखक म्हणून जयंत पवार यांचा उल्लेख केला जातो. महानगरातील जीवनाचे, त्यातील संघर्षाचे चित्रण करत त्यांनी ऐंशीच्या दशकात महानगरात निर्माण झालेल्या वास्तवाचे चित्रण आपल्या कथांतून केले आहे. नव्वदोत्तर मराठी साहित्याच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचे प्रतिबिंब त्यांच्या कथांमध्ये प्रभावीपणे उमटलेले दिसते. त्यांच्या कथांतून महानगरीय जीवन, कामगार वर्गाचे प्रश्न, जागतिकीकरणाचे परिणाम, मानवी अस्तित्वाची घुसमट आणि सामाजिक विषमता यांचे वास्तवदर्शी चित्रण आढळते. प्रस्तुत लेखात जयंत पवार यांच्या कथालेखनातील सामाजिक भान, आशयसूत्रे, कथनतंत्र, आणि भाषिक वैशिष्ट्ये यांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे.

- **मुख्य शब्द:**

जयंत पवार, मराठी कथा, महानगरीय जीवन, कामगार वर्ग, सामाजिक वास्तव, कथाशैली. जात-वर्ग संघर्ष, जागतिकीकरण.

- **प्रास्ताविक:**

कथा हा मराठी साहित्यातील एक प्रमुख साहित्यप्रकार आहे. कथा सांगणे आणि ऐकणे यातून कथेचा विकास घेत गेला. मराठी कथेला लोककथा,जातककथा, पौराणिक कथा, व्रत कहाण्या अशा परंपरेतून मराठी कथा विकसित होत गेली. एकोणिसाव्या शतकात विविध भाषांतून मराठीत कथेची भाषांतरे येऊ लागली. पुढे स्वातंत्र्योत्तर कालखंडात निर्माण झालेल्या विविध साहित्य प्रवाहांनी तिला अधिक समृद्ध केले. मनोरंजन हा कथेच्या निर्मितीमागील मुख्य हेतू होता. पण कालानुरूप तिचे स्वरूप आणि साहित्यमूल्ये बदलत गेली. लघुकथा, दिर्घकथा असा प्रवास करत मराठी कथा अधिक प्रगल्भ होत गेली. १९९० नंतरच्या मराठी कथालेखनात सामाजिक वास्तवाचे नवे संदर्भ पुढे आले. उदारीकरण, जागतिकीकरण आणि औद्योगिक बदलांमुळे समाजजीवनात मोठ्या प्रमाणावर परिवर्तन झाले. या परिवर्तनाचा सर्वाधिक परिणाम कामगार वर्ग,मध्यमवर्ग आणि महानगरातील सामान्य नागरिकांवर झाला. जयंत पवार यांनी आपल्या कथांमधून या

बदलत्या वास्तवाचे संवेदनशील चित्रण केले आहे. त्यांच्या कथांमध्ये केवळ सामाजिक परिस्थितीचे वर्णन नसून बदलत्या व्यवस्थेमुळे निर्माण झालेल्या मानवी वेदना व दुःख, अस्तित्वाची लढाई आणि अस्मितेचा संघर्ष यांचेही चित्रण आढळते. त्यामुळे त्यांच्या कथालेखनाने समकालीन मराठी साहित्यात वेगळे स्थान निर्माण केले आहे.

- **समकालीन समाजजीवनाचे वास्तववादी चित्रण**

नव्वदोत्तर कालखंडात मराठीत कथालेखन करणारे कथाकार म्हणून जयंत पवार लक्ष वेधून घेतात. 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' (२०१०), 'वरणभात लोणचं नि कोन नायकोन्चा' (२०१५), लेखकाचा मृत्यू आणि इतर गोष्टी (२०२०) आणि 'मोरी नींद नसानी होय' (२०२१) हे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. मुळात जयंत पवार हे एक नाटककार म्हणून अधिक परिचित आहेत. नाट्य समीक्षक हीदेखील त्यांची एक ओळख सांगता येईल. एकांकिका, वैचारिक लेखन कादंबरी लेखन यासारखे अन्य साहित्यप्रकार देखील त्यांनी हाताळले आहेत. ज्या कालखंडात जयंत पवार लेखन करतात तो काळ हा जागतिकीकरणानंतरच्या परिणामांचा, उत्तर आधुनिकतेचा काळ आहे. त्यामुळे या काळातील परिवर्तनांचा प्रभाव त्यांच्या लेखनातून उमटलेला आहे. विशेषतः नव्वदनंतरच्या मराठी कथेचा विचार करत असताना जागतिकीकरणाने निर्माण केलेल्या जटील, भयावह समस्यांना दुर्लक्षून चालत नाही. जागतिकीकरणामुळे भारतीय समाज-सांस्कृतिक प्रारुपात मूलगामी बदल झाले. जागतिकीकरणातून आकाराला आलेल्या नवभांडवलदार संरचनेमुळे गरीब आणि श्रीमंत अशी दरी निर्माण झाली. शोषित, कष्टकरी, शेतकरी वर्ग यामध्ये भरडला गेला. ग्रामीण आणि नागर जीवनाच्या सीमारेषा धूसर झाल्या. नवे पेच निर्माण झाले. महानगरातील कष्टकरी सामान्य माणसाचा या आक्रमणासमोर निभाव लागला नाही. याच काळात जातीय, धार्मिक अस्मिता अधिक बळकट झाल्या. गावगाड्यातील कृषिजनसंस्कृतीशी निगडित अनेक नव्या समस्या उभ्या राहिल्या. ग्रामीण भागात झालेल्या राजकारणाच्या शिरकावाने गावच्या एकसंधपणाला तडे गेले. स्त्री-पुरुष नातेसंबंधात नवे ताण निर्माण झाले. या कालावकाशाचे आकलन जयंत पवार यांच्या कथेतून कसे येते, अशा सर्व संभ्रमित करणाऱ्या वास्तवाला त्यांनी कसा प्रतिसाद दिला, तुकड्या-तुकड्यात विखुरलेल्या आजच्या वास्तवाला सांधण्यासाठी त्यांनी कथा लेखनात काय नाविन्य आणले, हे पाहणे महत्त्वाचे वाटते. मुंबईसारख्या महानगरात त्यांच्या आयुष्याचा प्रारंभीचा काळ गेल्याने या काळात या महानगरात घडणाऱ्या बदलाचा संदर्भ त्यांच्या लेखनातून येतो. जागतिकीकरण आणि खासगीकरणाच्या प्रभावाने उजाड होणारे मुंबईतील गिरणगाव आणि तेथील जगण्याचे संदर्भ हे त्यांच्या लेखनाचे अंतःसूत्र ठरले आहे. कथेसारख्या साहित्यप्रकारातून येणारा आशय हा कल्पित वास्तवावर आधारलेला असतो. माणसाच्या भोवतालचा निसर्ग, समाज आणि तेथील संस्कृती यातील मानवी परस्परसंबंधाची विविध अंगे माणसाच्या जगण्याच्या प्रक्रियेचा भाग असतात. या संदर्भांचेच अनुकरण कथाकार करतो आणि हे संदर्भ त्याच्या लेखनाचा आशय बनून आविष्कृत होतात. अशा आशयसुत्रांतूनच लेखकाचा जगण्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन सुस्पष्ट होत असतो. जयंत पवार यांच्या कथांतून येणारी विविध आशयसूत्रे समकाळातील असे अनेक संदर्भ आणि समकालीन वास्तव यांना घेऊन येतात.

जागतिकीकरणानंतर सुरु असलेला औद्योगिक ऱ्हास, गिरणी कामगारांचे विस्थापन आणि महानगरीय जीवनातील असुरक्षितता यांचे चित्रण करणारा आशय त्यांच्या कथांमध्ये अभिव्यक्त होतो. गिरण्यांच्या बंद पडण्यामुळे उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबांचे वास्तव ते मांडतात. कामगारांच्या आर्थिक असुरक्षिततेमुळे निर्माण झालेली सामाजिक अस्थिरता त्यांच्या कथांतून प्रभावीपणे व्यक्त झाली आहे. औद्योगिक बदलांमुळे अनेक कुटुंबे सामाजिक आणि मानसिक पातळीवर विस्थापित झाली. त्यांच्या कथांतील पात्रे शहरात राहूनही परकी झालेली दिसतात. अस्तित्वाचा संघर्ष हे या व्यक्तिरेखांच्या जगण्याचे वास्तव आहे. त्यांच्या कथांतील पात्रे जीवनातील संघर्षांशी झुंज देताना दिसतात. त्यांच्या संघर्षातून नवउदारमतवादी व्यवस्थेतील मानवी वेदना प्रकट होतात. त्यांच्या 'वरणभात लोणचं नि कोन नायकोन्चा' या कथासंग्रहातील कथांतून सामान्य माणसाच्या जीवनाचे  वास्तववादी चित्रण येते. महानगरीय समाजातील उपेक्षित, शोषित आणि मध्यमवर्गीय जीवनाचे वास्तव चित्रित ते करतात. अक्राळविक्राळ विस्तारणाऱ्या महानगरांतील माणसाच्या जगण्यातील एकाकीपणा, शहरातील गर्दीत माणूस एकटा पडत चालल्याचे चित्र त्यांनी या कथासंग्रहातील कथांमधून केले आहे.

विशेषतः 'वरणभात लोणचं नि कोन नायकोन्चा'  या कथेतून झोपडपट्टीतील असहाय्य विश्व त्यांनी चित्रित केले आहे. महानगरातील जीवनाचे, त्यातील संघर्षाचे चित्रण करत त्यांनी ऐंशीच्या दशकात महानगरात निर्माण झालेल्या सामाजिक प्रश्नांचा वेध घेतला आहे. या काळात महानगरांत बिल्डरलॉबी आणि या व्यवसायातील गुंडगिरी आणि राजकारण्यांचे वाढते प्रस्थ यामुळे झोपडपट्ट्यांच्या जागी उंचच उंच इमारती उभ्या राहिल्या. मात्र अशा विकासच्या देखाव्याखाली अनेकांची आयुष्ये भरडली गेली. बय, बाबी, धनू आणि डिग्या यांची आयुष्ये यात कशी भरडली गेली ही यांच्या आयुष्याची परवड या कथेतून मांडली आहे. या विकासाच्या मोहमयी जगात त्यांना स्थान नाही. अनेक पात्रे असलेल्या या कथेत नागरी जीवनातील वंचितांची फरपट आणि शोकांतिका चित्रित केली आहे. कामगार संस्कृतीचे उच्चाटन ही किती उन्मळून टाकणारी गोष्ट आहे ये या कथेतून जाणवते. कथेतील विविध पात्रांच्या आयुष्याशी संवेदनशील आत्मीयतेने एकरूप होत त्यांनी वाचकाला हेलावून टाकणारे वास्तव कथेतून रेखाटले आहे. कल्पकता,अद्भुतता, विनोदी शैली तर कधी उपहासाची जोड देत वंचित समूहाच्या जीवनातील व्यथा, वेदना, अगतिकता या कथेतून त्यांनी मांडली आहे. अतिशय सूक्ष्म प्रसंगचित्रण, शब्दांच्या आधारे मूर्त रुपाची अनुभूती देणारी चित्रबद्ध वर्णने, विकासाच्या समकालीन व्यवस्थेत दिसणारा अंतर्विरोध या कथेतून ते रेखाटतात. रूपबंध आणि आशय यांच्या दृष्टीने भिन्न व लक्षवेधी अशी ही कथा आहे. समाजातील सांस्कृतिक अंतर्विरोध देखील ते अतिशय सूक्ष्म पातळीवर रेखाटतात.

याच कथासंग्रहातील ‘तुझीच सेवा करू काय जाणे’ या कथेतून जयंत पवार यांनी मुंबईमधील चाळसंस्कृती, तेथील चाकरमानी आणि त्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न याचे चित्रण करत समाजाच्या पारंपरिक विचारसरणीचा आढावा घेतला आहे.

देव, नवस सायास यात कितीही स्वत:ला गढून घेतले तरी पोटाची भूक भागात नाही. आपल्या घराण्यात तीन पिढ्या लालबागच्या राजाची सेवा करणारा बाळा मेस्त्री, त्याची श्रीगणेशावरील श्रद्धा आणि त्यातून आलेले वैफल्य,जगण्याच्या संघर्षात त्याची झालेली पडझड, बेरोजगारी, गरिबी आणि शहरी संस्कृतीत तेथील माणसांच्या वाट्याला येणारे अनेक प्रश्न मग ते राहण्यासाठी किमान छप्पर मिळावे यासाठी सुरु होणारा संघर्ष असो की रोजचा पोटापाण्याचा प्रश्न असो या प्रत्येक टप्प्यावर त्याची होणारी परवड लेखकाने प्रभावीपणे मांडली आहे. बाळा मेस्त्री, गजानन, चिंट्या, या पात्रांच्या भावविश्वातून या संघर्षाचे आणि आपल्या अस्मिता, दैववाद याला चिकटून राहण्याच्या भाबड्या वृत्तीचे दर्शन घडते. मुंबईतील गिरणीकामगारांचे प्रश्न, गिरण्या बंद होऊ लागल्याने त्यांच्यावर कोसळलेले बेरोजगारीचे संकट पण तरीही आपल्या उत्सवी संस्कृतीवरील निष्ठांतून सुरु असलेली त्यांची जगण्याची धडपड आणि त्यासाठी करावा लागणारा संघर्षाची अशी ही कथा आहे. भक्तांकडून देवाची परीक्षा पहिली जाते. देव या परीक्षेत उतरत नाही. यात मिलमालकाच्याकुटीलनीतीने देवाचे आणि भक्तांचेही गर्वहरण होते. तरीही गजाननाने मिलमालकाला कशी शिक्षा केली, त्याने आत्महत्या कशी केली, त्याची दोन्ही मुले वेडी कशी झाली याविषयीची कथा आख्यानात समाविष्ट करतो. हे एक सांस्कृतिक कथन म्हणू याकडे पाहिल्यास सामाजिक संरचनेतील अंतर्विरोध दडपण्याचे कार्य संस्कृतीच्या आधारे कसे केले जाते याचे प्रत्यंतर येते. 'टेंगशेच्या स्वप्नात ट्रेन', 'जन्म एक व्याधी', 'छाटकभर रात्र' यासारख्या कथांतून देखील असा सांस्कृतिक अंतर्विरोध त्यांनी प्रभावीपणे मांडला आहे. 'छाटकभर रात्र' या कथेतून सत्य काय हे सांगण्याएवजी भ्रम निर्माण करत सांस्कृतिक सृजानातीलनिरर्थकता ते मांडतात. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या व्यक्तींना कथेच्या केंद्रस्थानी आणत विनाशाची वाट चालाव्या लागणाऱ्या, शोषणामुळे माणूसपण हरवलेल्या माणसांचे चित्रण ते करतात. संस्कृती हा सामाजिक परिस्थितीच्या परिणामांवरचा उपाय असायला हवा हे सूचन त्यांच्या या संदर्भांतून उलगडत जाते. लेखकाची परिवर्तनवादी दृष्टी या कथांमध्ये सातत्याने जाणवते.

- **मानवी संबंधांचे प्रभावी चित्रण**

जयंत पवार यांच्या कथेतील मानवी नातेसंबंध हे सामाजिकतेचे अंग बनून समोर येतात. व्यक्तीच्या शोषणाची, त्यामागील संहारकतेची पातळी इतकी सुसंबद्ध असते की माणसाच्या अस्तित्वाचा, त्याच्या जगण्याचा आणि मृत्यूचा कार्यकारण संबंध त्यातून उलगडत जावा. 'रमाकांत एक खोल विवर' या कथेतून जातिव्यवस्थेतील श्रेणीयुक्ततेचा संदर्भ येतो. या व्यवस्थेचा बळी ठरणारा माणूस आणि त्याला जोडून येणारी इतर पात्रे ही देखील व्यवस्थेचीच निर्मिती असली तरी माणूसपण हरवत चाललेल्या समूहाला ते पुढे नेतात. 'बाबलच्या आयुष्यातील धादांत सत्य' या कथेतून व्यवस्थेकडून होणाऱ्या श्रमिकाच्या शोषणाची प्रक्रिया ते मांडतात. 'हत्या' या कथेत घडलेल्या तिन्ही हत्या या समाज या शोषक व्यवस्थेने केलेल्या आहेत आणि त्यात सामाजिक नियमांचे काटेकोर पालन करणारी त्या कुटुंबातील नातेवाईक मंडळी देखील कशी सहभागी आहेत याचे चित्रण ते करतात. सामाजिकतेची बदलती चौकट, सामाजिक नियम, व्यवस्थेचे बदलते स्वरूप आणि त्यानुसार बदलणारी सामाजिक मूल्ये याविषयी अनेक प्रश्न ते वाचकाच्या मनात निर्माण करतात. या

व्यवस्थेचा बळी ठरणारा माणूस आणि त्याचे परस्परसंबंध यात निर्माण झालेले अंतर हे या व्यवस्थेचा एक भाग आहेत.आर्थिक आणि सामाजिक बदलांमुळे पारंपरिक नातेसंबंधांमध्ये आलेले ताण त्यांच्या कथांमधून व्यक्त होतात. समकालीन समाजातील दिसून येणारे नातेसंबंधातील बदल ते बारकाव्याने मांडतात. शोषण,निरर्थकता यांच्या प्रभावातून साकारलेले जग मानवी नातेसंबंधांना चिरडतात. या व्यवस्थेत चिरडली जाणारी माणसे आणि त्यांना चिरडून टाकणारी माणसे हा या सामाजिक संरचनेचा भाग असल्याने माणसाच्या आंतरिक गुंत्याचा थांग त्यांच्या कथांतून लागत नाही. मात्र अशा शोषणामुळे माणूसपण हरवलेल्या मानवी संबंधांचे प्रभावी चित्रण त्यातून झालेले दिसते. जयंत पवार यांच्या कथेतून येणारा हा ताण केवळ मानवी नातेसंबंधातीलच आहे असे नाही तर व्यक्तीच्या आंतरिक संघर्षात देखील जो विशिष्ट ताण असतो त्याचे देखील अतिशय प्रभावी चित्रण येते. याविषयी स्वतः कथाकार पवार यांनीच विधान केले आहे. ते म्हणतात, “समाज आणि व्यक्ती यांच्यात ताण असतो, तसाच व्यक्ती -व्यक्ती संबंधात ताण असतो आणि तो एकाच व्यक्तीमध्ये अनेक ताण असू शकतात. ताणांमधलं हेरणं हा माझ्या कथेचा एक भाग असत आला याला कारण व्यक्ती आणि समष्टीकडे समभावाने बघण्याची माझ्या जगण्याने आणि नाटकाने मला दिलेली दृष्टी होय.”[१] त्यांच्या कथातून उभा राहणारा संघर्ष हा अशा व्यक्ती-समाज, व्यक्ती-व्यक्ती आणि एकाच व्यक्तीच्या आंतरिक ताणातून निर्माण होतो. यातून जे वास्तव आकाराला येते ते त्यांच्या कथेला समृद्ध करते.

- **स्त्रीत्वाची अनेकविध रूपे**

जयंत पवारांच्या कथांतून स्त्रीत्वाची अनेकविध रूपे प्रकट होतात. भारतीय समाजात स्त्रीकडे पाहण्याचा संकुचित दृष्टिकोन, महानगरातील स्त्रीचा अस्तित्वसंघर्ष ते बारकाव्याने चितारतात.जागतिकीकरणानंतर झालेल्या बदलांमुळे स्त्रीच्या जगण्यात झालेले बदल, तिचे बदललेले प्रश्न आणि तिच्या जगण्याला व्यापून असलेल्या समस्या यांचे चित्रण त्यांच्या कथांतून येते. बदलत्या सामाजिक-सांस्कृतिक परिघात स्वतःची नवी ओळख निर्माण करणारी, अन्यायाविरुद्ध खंबीरपणे उभी राहणारी, कुटुंबाचा आधार बनणारी स्त्री ते रेखाटतात. महानगरीय समाजातील स्त्रीच्या जगण्यातील अस्थिरता, झोपडपट्टीत जगण्याच्या संघर्षाला बळी पडलेली स्त्री जशी ते रेखाटतात तशीच या प्रसंगांना धैर्याने सामोरे जाणारी आणि तरीही आपला आत्मसन्मान जपणारी स्त्री देखील त्यांनी कथेतून रेखाटली आहे.

- **रचनाबंधाचे वेगळेपण**

कथेत कथकाच्या कथनव्यवहारातून रूपबंध आकारास येत असतो. कथेतील जग आणि प्रत्यक्षातले जग वेगळे असते. कथनाच्या विशिष्ट प्रकारच्या योजनेतून कथेतील जगाला रूप प्राप्त होत असते. त्यामुळे कथेच्या रुपबंधाचा सर्वात महत्त्वाचा घटक कथक असतो. जयंत पवार यांच्या कथांतील कथक हा कथाबाह्य अंगाने कथनाची प्रक्रिया करत असतो. कथेला व्यापून असणाऱ्या काल आणि अवकाशात तो कुठेही मुक्तपणे वावरतो. कथेतील सर्व पात्रांच्या अंतरबाह्य वर्तनाचा

अन्वयार्थ तो लावत असतो. कथकच्या अशा योजनेमुळे त्यांच्या कथेचा आकृतीबंध वेगळा ठरतो. 'तर्काच्या खुंटीवरून निसटलेलं रहस्य' या कथेतून रहस्य कथेचा आकृतिबंध स्वीकारत त्यांनी आयुष्यातील जटील, गूढ अशा सत्याच्या पलीकडे असलेला अंधार आणि या अंधाराच्या पलीकडे जात अशा कटू वास्तवाला भिडण्याचे धाडस ते करतात. या कथेतील काका आपल्या पुतण्याला सांगतो,"आयुष्य जटील आहे. सगळीकडेच उजेड नसतो. जिथे उजेड नसतो तिथे पुरेसा काळोखही नसतो. मात्र जिथे जिथे भुयार असतात तिथे त्याच्या आत काळोख असतो. आपल्याला वाटतं आत काही आहे पण काही सापडेल म्हणून हात घालून बसलात तर झ्याट काही सापडत नाही. प्रत्येक रहस्यामागे एक सत्य असतं पण काळोखातून ते आलंच समोर तर भाजून काढतं भोसडीचं."[२] विविध स्तरावरील माणसांची होणारी अधोगती हा या कथेचा गाभा आहे. प्रत्येक गोष्टीला काही कारण असते आणि ते आताच्या धकाधकीच्या काळात कोठूनही उद्भवते हे सूत्र या कथेतून जाणवते. वास्तव आणि अवास्तव यांची बेमालूम सांगड या रहस्यकथेतून त्यांनी घातली आहे. या कथेची कमालीची दृश्यात्मकता, शब्दफेक या विशेषामुळेच या कथेचे अभिवचन,श्रुतिका निर्माण झाल्या. या कथेची निवेदनशैली ही पारंपरिक धर्मग्रंथांतून आलेल्या लोककथांसारखी आहे.

- **कथनशैली**

वास्तववादी कथन हे जयंत पवार यांच्या कथनशैलीचे वेगळेपण ठरते. त्यामुळे त्यांची कथा कृत्रिमतेपासून दूर जातेच पण त्याबरोबरच सामाजिक वास्तवाचे दस्तऐवजीकरण करत आशयाला अधिक पुष्ट करण्यास देखील त्यामुळे संधी मिळते. बोलीभाषेचा वापर करत कथनातील सहजता ते जपतात. मुंबईतील कामगार वर्गाची भाषा आणि लोकजीवन त्यांच्या कथांमध्ये नैसर्गिकपणे आले आहे. संवादप्रधानता हे देखील त्यांच्या कथनशैलीचे बलस्थान आहे. त्यांच्या कथांतील संवाद पात्रांचे व्यक्तिमत्त्व उलगडतात आणि कथानकाला वास्तववादी स्वरूप प्राप्त करून देतात. आशयात बेमालूमपणे मिसळेले भाषेचे विलक्षण उपयोजन,कथानातील प्रायोगिकता, प्राचीन मिथाकांची मोडतोड करत साकारलेले कथानक आणि निवेदनातील नाविन्य, रुपबंधाचे नवे प्रयोग हे त्यांच्या कथांचे वैशिष्ट्य सांगता येईल. प्रतीकात्मकता हा देखील या कथनशैलीचा विशेष सांगता येईल. जसे 'फिनिक्स' हे पुनर्जन्माचे प्रतीक आहे. संघर्षातून उभ्या राहणाऱ्या जीवनशक्तीचे दर्शन या प्रतिमेतून घडते. अशा अनेक प्रतीकांचा वापर त्यांनी आपल्या कथांतून केला आहे.मुंबईसारख्या महानगरातील वस्त्या,गीरणगावातील कामगार वस्तीचे, चाळसंस्कृतीचे आणि तिथल्या माणसांचे जगण्यातील ताण, माणसाचा कोतेपणा,अहंकारी वृत्ती यांचे चित्रण त्यांच्या कथांतून प्रभावीपणे येते.

'तर्काच्या खुंटीवरून निसटलेलं रहस्य' ही कथा देखील रचनातंत्र, आशय आणि निवेदनशैलीच्या बाबतीत वेगळेपण सिद्ध करणारी आहे. प्रायोगिकता हा विशेष त्यांच्या या कथांतून जाणवतो. 'तर्काच्या खुंटीवरून निसटलेलं रहस्य' या कथेतून लेखकाच्या लेखन प्रवासाचा, त्याच्या भावविश्वाचा वेध घेतला आहे. या कथेतून गुंफलेल्या गुढ, रहस्यातून वाचकांच्या

मनात कुतूहल टिकविण्यात लेखक यशस्वी झाला आहे. त्यांच्या कथांतून येणारा परिसर हा मुंबईसारख्या महानगरातीलच आहे. मानवी नातेसंबंधांतील ताणतणाव,वासानांधता, द्वेष या सारख्या भावनांचा उलगडा या रहस्यातून वाचकाला होत जातो.

जयंत पवार यांचे समकालीन कथालेखनातील योगदानाबद्दल संदीप दळवी म्हणतात, "या काळाचे समर्थ कथाकार म्हणून जयंत पवार यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. मराठी कथेच्या कक्षा रुंदावण्यामध्ये त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. महानगरातील पालटलेल्या स्थितीगतीचा, सामान्य माणसाच्या विस्थापनाचा, कष्टकरी कामगारांच्या समूह मानसिकतेचा तळठाव त्यांची कथा घेते. वास्तव आणि कल्पिताचा खेळ उभा करत पृष्ठस्तरीयअनुभवद्रव्याचे अनेक कंगोरे त्यांनी उजागर केलेले आहेत. रहस्यकथेच्यारुपबंधाचा अभिनव वापर त्यांनी केला. इतिहासाचे, पुराणांचे पुनर्वाचन केले. अनेकांच्या दृष्टीतून कथा रचली. कोणत्या पात्राच्या कथनातून आपण विधानापर्यंत पोहोचू यासंबंधीच्या शक्यता तपासल्या. कथनाचे सातत्याने प्रयोग केले. यामुळे त्यांना एकापेक्षा जास्त पात्रांचे जीवनानुभव कथेच्या संरचनेत मुरवता आले. या वैविध्यामुळे त्यांची कथा बहुपदरी झाली. समर खडस यांची कथा ही महानगरीय अवकाशासंदर्भात असली तरी ती धार्मिकता, स्त्री-पुरुष संबंध, राजकारण, हिंसा, क्रौर्याचे विदारक दर्शन घडविते. आपल्या कथांच्या शेवटी ज्या सत्याकडे ते नेतात, ते क्रौर्याने भारलेले असते. त्यांच्या कथेतील मानवी हिंस्र दर्शनाने रूढ वाचकाला असांकेतिकतेचे धक्के बसतात. अतिशय प्रवाही, उत्कंठावर्धक आणि बेधडक शब्दबंधातून त्यांनी समकालीन समाजवास्तवाची केलेली चिकित्सा ही समाज चिकित्सेचा आदर्श नमुना आहे."[३] जयंत पवार यांच्या कथेने मराठी कथेला नवे रूप दिले. नवा आशय घेऊन येणारी ही कथा मराठी कथेला समृद्ध करणारी ठरली आहे.

- **निष्कर्ष:**

➢ जयंत पवार यांच्या कथा लेखनातून सामाजिक वास्तवाचे प्रभावी चित्रण आले आहे. समकालीन समाजातील सामाजिक-सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक संदर्भांचा वेध त्यांनी आपल्या कथेतून घेतला आहे.

➢ कामगार वर्ग, विस्थापित आणि महानगरीय परिघातील समूहाच्या जगण्यातील संघर्षाचे वास्तव ते अधिक गांभीर्याने कथेतून मांडतात.

➢ समकालीन समाजातील जागतिकीकरणानंतरचे परिणाम, आर्थिक विषमता, वर्ग-जात संघर्ष आणि त्यातून निर्माण होणारे मानवी संघर्ष याचे चित्रण त्यांच्या कथांतून प्रभावीपणे झालेले आहे.

➢ वास्तववादी दृष्टी,रचनातंत्रातील प्रयोगशीलता आणि कथनशैलीतील वेगळेपण यामुळे त्यांची कथा लक्षवेधी ठरते.

➢ बोलीभाषेचा प्रभावी वापर,कथनशैलीतील प्रतीकात्मता व संवादप्रधानता हे त्यांच्या कथा लेखनाचे वेगळेपण आहे.

➢ मराठी कथेचा आशय अधिक व्यापक आणि सामाजिक संवेदन अभिव्यक्त करणारी कथा म्हणून मराठी कथेत जयंत पवार यांच्या कथा लेखनाने मोलाची भर टाकली आहे.

- **समारोप:**

जयंत पवार यांनी नव्वदोत्तर मराठी कथेला नवा आशय आणि नवी सामाजिक जाणीव दिली. त्यांनी महानगरीय जीवन आणि कामगार वर्गाचे वास्तव साहित्याच्या केंद्रस्थानी आणले. त्यामुळे त्यांच्या कथांना समकालीन मराठी साहित्यात विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.जयंत पवार यांचे कथालेखन सामाजिक वास्तवाशी घट्ट जोडलेले आहे. कामगार वर्ग, विस्थापन, आर्थिक विषमता आणि मानवी संघर्ष यांचे त्यांनी अत्यंत प्रभावी चित्रण केले आहे. वास्तववादी दृष्टी, भाषेची सहजता आणि सामाजिक बांधिलकी यांमुळे त्यांचे कथालेखन समकालीन मराठी कथेसाठी महत्त्वपूर्ण ठरले आहे. नव्वदोत्तर मराठी कथेच्या भरणपोषणात त्याचे कथालेखन लक्षवेधी ठरते ते त्यांच्या या वेगळेपणामुळे.

- **संदर्भसूची**

1. पवार जयंत, शब्द रुची,कथा विशेषांक, डिसेंबर २०१९, वर्ष सातवे, अंक आठवा,पृ. ३४.
2. पवार जयंत, तर्काच्या खुंटीवरून निसटलेले रहस्य, मुक्त शब्द, मे २०१४, वर्ष ५, अंक १, पृ. १७.
3. https://www.aaplamahanagar.com/featured/saransh/marathi-stories-after-1990s/291721/ २२ सप्टेंबर २०२१
4. पवार जयंत, मुक्त शब्द, मे २०१२,वर्ष ३ ,अंक १, पृ. ३३
5. पवार जयंत, मुक्त शब्द, मे २०१४ ,वर्ष ५, अंक १.पृ. १७
6. पवार जयंत,फिनिक्सच्या राखेतून उठला मोर, लोक वाङमय गृह, प.आ.२०१०
7. पवार जयंत,'वरणभात लोणचं नि कोन नायकोन्चा',पॉप्युलर प्रकाशन, प.आ.२०१५
8. कुलकर्णी अजय व इतर,नव्वदोत्तर मराठी साहित्य,विजय प्रकाशन, प्रथमावृत्ती, २०१८
9. कुलकर्णी अजय, समकालीन मराठी कथा : स्वरूप आणि चिकित्सा,कॉन्टिनेन्टल प्रकाशन,आ.प. २०१५